International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal
ISSN: 2457-0362
www.ijarst.in

# भारतातील लोकसंख्या वाढीचे परिणाम व उपाय

**Sahebrao Daulat Nikam**

B.Y.K. College of Commerce, Nashik, Maharashtra, India

सारांश:

लोकसंख्या स्फोट ही एक अतिषय भीषण समस्या जगासमोर उभी आहे. वाढते शहरीकरण, दरडोई उत्पन्नात घट, बेरोजगारी, कृषी क्षेत्रावर पडणारा ताण, लोकांचे शहरात होणारे स्थलांतर याचाच अर्थ सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे विशेष लक्ष वेधले जाते. आणि त्यावर विचारमंथन देखिल केले जात आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी अनेक नवनवीन प्रयत्न केले जातात. वाढणाऱ्या लोकसंख्ये विषयी देखिल जनमाणसात जागृती करण्यासाठी युनोने 1989 सालापासून 11 जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणुन घोषित केला. लोकसंख्या नियंत्रणासाठी जागतिक स्थरावर सर्व देशांनी एकत्र येवून ठोस उपाययोजना करण्याची तिव्र गरज निर्माण झाली आहे. भारतासारख्या देशात लोकसंख्येचा स्फोट आटोक्यात आणण्यासाठी आपण आपली पावले उचलणे गरजेचे आहे. त्यात कठोर कायद्यांची व कठोर अंमलबजावणीची गरज निर्माण झाली आहे. म्हणून एक कुटूंब एक मुल हा विचार काळाची मोठी गरज आहे. त्याचा प्रचार व प्रसार करणे तसेच अनेक महत्वाच्या उपाय योजनांची अंमलबजावणी केली तरच देशाचे कल्याण होवू शकते.

संज्ञा : लोकसंख्या विस्फोट, विकास, गुणवत्ता, प्रमाण, दरडोई उत्पन्न आणि बेरोजगारी इ.

## प्रस्तावना -

लोकसंख्या हे श्रमशक्तीचे साधन आहे. लोकसंख्येचा आकार जितका मोठा असेल तितकी श्रमशक्ती मोठी असेल. केवळ श्रमाने काहीही निर्माण होऊ शकत नाही. जर उत्पादनासाठी आवश्यक असलेली इतर संसाधने देखील पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील तर श्रमशक्ती ही देशासाठी उत्पादक मालमत्ता असते. जर इतर संसाधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसतील तर मोठी श्रमशक्ती आर्थिक वाढीसाठी अडथला बनू शकते. लोकसंखेच्या वेगवान वाढीमुळे देशाच्या आर्थिक विकासावर कसा परिणाम होतो यावर प्रकाश टाकण्याचा या शोधनिबंधाचा हेतू आहे. आणि लोकसंख्येच्या स्फोटावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही उपाय सुचविण्याचा देखिल प्रयत्न केला आहे. जेणे करून भारताच्या आर्थिक विकासात अडथळा येऊ नये.

## उद्दिष्ट्ये -

1) भारतातील लोकसंख्या वाढीच्या कारणांचा अभ्यास करणे.

2) भारतातील वाढत्या लोकसंख्येचा सामाजिक, आर्थिक व पर्यावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

3) भारतीय लोकसंख्या वाढ नियंत्रणासाठी उपाय सुचवणे.

गृहितक - भारतातील वाढत्या लोकसंख्येचा सामाजिक, आर्थिक व पर्यावरणावर प्रतिकुल परिणाम झालेला आहे.

संशोधन पद्धती -

या प्रस्तूत शोध निबंधामध्ये दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये या विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, जनगणना अहवाल, नियतकालिके, मासिके, विविध पुस्तके, इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

लोकसंख्या वाढीची कारणे -

1. जन्म-मृत्युदर ः आपल्या देशात मृत्युदरात घट झाली आहे. आपल्या देशाचा 1000 लोकांमध्ये जन्मदर 27.5 आहे व मृत्युदर 0.5 आहे. त्यामुळे लोकसंख्येत वाढ होत आहे.

2. अज्ञान, अंधश्रद्धा व रुढी-परंपरा ः समाजामध्ये काही अंधश्रद्धा असतात. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, मेल्यावर पाणी पाजण्यास, अग्नी देण्यास व इस्टेटीला वारस मुलगाच पाहिजे अशा विचारसरणीमुळे मुलाची वाट पाहत कुटूंबात माणसे वाढतात. मुलगी ही परक्याचे धन समजले जाते त्यामुळे मुलगा होईपर्यंत कुटुंब नियोजन केले जात नाही. काही वेळेस पहिल्या पत्नीला मुलीच झाल्या तर दुसरा विवाह केला जातो व त्या पत्नीकडूनही कुटुंब वाढविले जाते त्यामुळे लोकसंख्येत वाढ होतांना दिसून येते.

3. जन्म ही ईश्वरी देणगी आहे ः काही समाजामध्ये कुटुंब नियोजन करणे पाप मानले जाते. जन्म ही ईश्वरी देणगी समजले जाते. या अंधश्रद्धेपोटी लोकसंख्या वाढ होतांना आढळून येते.

4. बालमृत्यु व अर्भक मृत्युचे प्रमाण ः ग्रामिण भागामध्ये बालमृत्युचे व अर्भक मृत्युचे प्रमाण जास्त असल्यामुळे अनेक मुलांना जन्म दिला जातो. त्यामुळे देखिल लोकसंख्या वाढ होते.

5. मुलीच्या लग्नाचे वय ः ग्रामीण भागामध्ये 15-16 व्या वर्षीच मुलीचे लग्न करुन दिले जाते. लग्न झाल्यावर लवकर मुले होतात. त्यावर नियंत्रण करण्याकरीता तिला कुटुंब नियोजनाबद्दल अज्ञान असते. त्यामुळे हे देखिल लोकसंख्या वाढीचे भर घालणारे महत्वाचे कारण आहे.

6. निरक्षरता ः आपल्या देशात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. निरक्षरतेमुळे अंधश्रद्धा वाढतात. अशी लोकसंख्या वाढली तर माणसाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. शिवाय शासनालासुद्धा आरोग्य सुविधा व इतर सुविधा पुरविणे अवघड होते. तेव्हा ही लोकसंख्यावाढ थांबविण्यासाठी विविध स्तरावर अनेक प्रयत्न चालू आहेत. ग्रामीण व शहरी भागातील स्त्री-पुरुषांमध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. लोकसंख्या वाढीमुळे अनेक अडचणी उभ्या राहतात. त्या संबंधीची जाणिव लोकांमध्ये निर्माण करायला हवी.

लोकसंख्या वाढीचे परिणाम -

1. नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर ः जलद लोकसंख्या वाढीमुळे देशाच्या नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर होतो. भारतात बहुसंख्य लोक त्यांच्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शेतीची धारणा कमी होत चालली आहे आणि त्यामुळे शेती करणे खूपच कमी होत आहे. नवीन जमीन वापरून शेतीचे उत्पादन वाढण्याची शक्यता नाही. पाण्याचा तुटवडा,मातीची झीज, जंगलतोड, वायू आणि जलप्रदूषण यामुळे अनेक क्षेत्रांना त्रास होतो. भारताची लोकसंख्या वाढत राहिल्यास

IJARST
International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
ISSN: 2457-0362

पर्यावरणावर होणारा परिणाम विनाशकारी होऊ शकतो. लोक नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास करत आहेत आणि त्यामुळे पर्यावरणाचाही ऱ्हास होत आहे.

2. कमी दरडोई उत्पन्न ः लोकसंख्यावाढीचा दर हा दरडोई उत्पन्नावर होणारा प्रतिकूल परिणाम आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळे दरडोई उत्पन्न दोन प्रकारे कमी होते. (1) जमिनीवर लोकसंख्येचा दबाव वाढतो, यामुळे उपभोगाच्या वस्तूंच्या किमतीत वाढ होते. कारण त्यांचा पुरवठा वाढवण्यासाठी उत्पादन घटकांची कमतरता भासते. (2) तसेच भांडवल जमा होण्यात घट होते. कारण कुटुंबातील सदस्य वाढल्याने खर्च वाढतो. दरडोई उत्पन्नावर लोकसंख्यावाढीचे हे प्रतिकूल परिणाम होतात.

3. बेरोजगारी ः झपाट्याने वाढणारी लोकसंख्या भारतीय अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी निर्माण करते. जसजशी लोकसंख्या वाढते. तसतसे एकूण लोकसंख्येतील कामगारांचे प्रमाण वाढते. परंतु पूरक संसाधनाच्या अनुपस्थितीत नोकऱ्यांचा विस्तार करणे शक्य नाही. श्रमशक्तीच्या वाढीसह, बेरोजगारी वाढीस लागते. वेगाने वाढणारी लोकसंख्या ही उत्पन्न, बचत आणि गुंतुवणूक कमी करते आणि त्यामुळे बेरोजगारी वाढते. शिवाय जमीन, भांडवल आणि इतर संसाधनाच्या संदर्भात श्रमशक्ती वाढते. म्हणून प्रति कामगार उपलब्ध पूरक घटक कमी होतात आणि परिणामी बेरोजगारी वाढते. भारतामध्ये बेरोजगाराच्या अनेक समस्या आहेत. यामुळे श्रमशक्तीच्या वास्तविक वाढीच्या तुलनेत बेरोजगारीची पातळी अनेक पटींनी वाढत आहे.

4. कृषी क्षेत्रावर पडणारा ताण ः भारतासारख्या विकसनशील देशात लोक बहुतांशी ग्रामीण भागात राहतात. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे लोकसंख्येच्या वाढीबरोबर जमिनीच्या क्षेत्रावर ताण पडत आहे. अतिरिक्त लोकसंख्येमुळे जमिनीच्या क्षेत्रावर अधिक लोक काम करीत असल्याने छुपी बेरोजगारीत भर पडत आहे. त्यामुळे दरडोई उत्पादकता कमी होते. भूमिहीन कामगारांची संख्या वाढली कि त्यांचे वेतन कमी होते. त्यामुळे त्यांचे कमी दरडोई उत्पादकता, बचत, आणि गुंतुवणूक करण्याची प्रवृत्ती कमी करते. परिणामी सुधारित तंत्रज्ञानाचा वापर आणि जमिनीवर इतर सुधारणा करणे शक्य होत नाही. शेतीतील भांडवल निर्मितीला फटका बसतो, आणि अर्थव्यवस्था निर्वाह पातळीपर्यंत अडकून बसते.आणि वाढत्या लोकसंख्येमुळे जीवनावश्यक गरजांची तीव्र टंचाई निर्माण होत आहे.

5. ग्रामीण भागातील लोकांचे शहरी भागात होणारे स्थलांतर ः वाढत्या लोकसंख्येमुळे लोकांच्या गरजा दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे राहण्याच्या जागेच्या समस्या, अन्न, पाणी, वैद्यकीय खर्च व इतर गरजांचा बोजा निर्माण होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात उत्पन्न कमी असल्याने त्यांच्या गरजा पूर्ण होत नसल्याने तेथील लोकांचा कल हा शहराकडे दिसून येतो. शहराकडे होणाऱ्या स्थलांतरामुळे,शहरातील लोकसंख्या वाढत असल्याने अशी परिस्थिती लोकांना गलिच्छ वस्तीत राहण्यास भाग पाडत आहे. तसेच घरांची अपुरी व्यवस्था, वाढलेली वाहतूक कोंडी, आरोग्यसेवा आणि स्वच्छता व्यवस्था यांसारख्या पायाभूत सुविधांवर ताण निर्माण होत आहे. परिणामी सामाजिक जीवनात अस्थिरता निर्माण होत आहे.

6. सामाजिक परिणाम ः जास्त लोकसंख्येमुळे समाजात सामाजिक अशांतता, राजकीय अस्थिरता आणि इतर संसाधने व जमीन यावरून संघर्ष निर्माण होत आहेत. समाजातील आरोग्यसुविधा, गरिबी, अन्नाची वाढती मागणी यामुळे विभिन्न अशा समस्या निर्माण होत आहे. निसर्गातील स्रोतांवर ताण निर्माण झाल्याने मानवाने विविध अशा पर्यायी साधनांची उपलब्धी करून घेतली आहे. परंतु त्या साधनांचा पुन्हापुन्हा वापर

International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal
www.ijarst.in
ISSN: 2457-0362
IJARST

होत असल्याने परिणामी पर्यावरण आणि हवामानात बदल झाल्याने जागतिक तापमानात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

7. आर्थिक परिणाम ः न्यूनतम लोकसंख्येचा व लोकसंख्यावाढीचा आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम घडून येत असतो. पर्याप्त लोकसंख्या ही विकासाच्या दृष्टीने आदर्श लोकसंख्या समजली जाते. लोकसंख्यावाढीवर परिणामकारकपणे बंधने न घातल्यास देशाच्या अन्नधान्य पुरवठ्यावर त्याचा विपरीत परिणाम होऊन दारिद्रयात वाढ होत जाते. लोकसंख्या वाढीमुळे रोजगाराची मागणी वाढत जाते. या बेरोजगारांना रोजगार पुरविला गेला नाही तर त्याचे सामाजिक, आर्थिक व राजकीय दुष्परिणाम देखिल दिसून येतात. लोकसंख्येच्या वाढीमुळे भांडवल निर्मिती मंदावते, आणि दरडोई उत्पन्न घटते. समाजातील अनेक कुटुंबातील लोकांचे उत्पन्न समान नसते त्यामुळे इतर सदस्यांचा उपभोग खर्च कुटुंबाला सोसावा लागतो. आणि त्यामुळे उपभोगावरील अधिक खर्च, कमी बचत आणि कमी गुंतवणूक असल्याने देशाच्या आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात.

लोकसंख्या नियंत्रणासाठी काही महत्वपूर्ण सुचविलेले उपाय -

1. विलंबित विवाहांना प्रोत्साहन देणे.

2. स्त्री शिक्षणाला आणि रोजगाराला प्रोत्साहन देणे.

3. शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागात वेगवेगळ्या कौटुंबिक नियोजन पद्धती उपलब्ध करून देणे व कार्यक्षम अशी अंमलबजावणी करणे.

4. लहान कौटुंबिक जीवनाला प्रोत्साहन देणे. आणि त्यासाठी विविध योजना राबवणे.

5. पर्यावरण संरक्षण करण्यासाठी वनसंवर्धन व इतर प्रयत्न करणे.

निष्कर्ष -

वरील विश्लेषणावरून असे दिसून येते, की लोकसंख्येच्या उच्च वाढीमुळे भारतासारख्या विकसनशील देशाच्या आर्थिक विकासाचा वेग मंदावला आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या उत्पादक क्रियाकलापांमध्ये श्रमशक्ती आत्मसात करणे अधिक कठीण ठरते. त्यामुळे विकसनशील देशांमधील मालमत्तेपेक्षा लोकसंख्येतील मोठी वाढ ही देखिल आर्थिक जबाबदारी आहे. शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनीची मागणी ही निवासस्थानांसाठी होत असल्याने, जंगलतोडीमुळे, जमिनीच्या सुपिकतेवर विपरीत परिणाम होतो. तसेच हवामानावर देखील परिणाम होतो. अतिरिक्त लोकसंख्येचा भार फक्त उपभोग वाढवतो. परिणामी, मागणी वाढल्याने संसाधनाचा तुटवडा निर्माण होतो असे दिसून येते. तसेच शोधनिबंधाचे संशोधक असे स्पष्ट करू इच्छितात कि, लोकसंख्या वाढ आणि आर्थिक विकास यांच्यातील परस्परसंबंध तेव्हाच अनुकूल होऊ शकतो जेव्हा वाढती लोकसंख्या ही देशातील उपलब्ध संसाधनाच्या प्रमाणात असेल आणि संसाधनाचा पूर्ण क्षमतेने, प्रभावी आणि कार्यक्षमतेने वापर केला जाईल.

संदर्भ सूची -

1. डॉ.श्रीधर आत्माराम देशपांडे, डॉ.विनायक श्रीधर देशपांडे ः भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण व विकास)

2. भागे कालिदास, मुंडे चांगदेव ,लोकसंख्या समाज, चिन्मय पब्लिकेशन, औरंगाबाद

3. कानिटकर तारा, कुलकर्णी सुमती (1979) लोकसंख्याशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे

4. कुलकर्णी एन.एस. ः लोकसंख्याशास्त्र आणि शिक्षण

5. खैरनार दिलीप (2007) लोकसंख्या आणि समाज, डायमंड पब्लिकेशन, पुणे

* * *